स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

समाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील

पीएच. डी. पदवी साठी सादर करावयाचा

संशोधन आराखडा

संशोधन विषय

राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज धार्मिक व सामाजिक कार्य: एक अभ्यास

संशोधक

प्रमोद कमलाकर नरखडे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सौ. एस. एस. शिंदे

यशवंत महाविद्यालय, नांदेड.

राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांचे धार्मिक व सामाजिक कार्य :- एक अभ्यास

प्रास्ताविकः

जैन धर्म हा भारतीय समजाचा व संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. जैन धर्माच्या आचार व विचारांनी तात्वीक मत प्रणालीनी व कौशल्यांनी भारतीय पंरपरेत महत्वाची भर घातली आहे. यज्ञविधीचा साचेबंदपणा व उपनिषदातील तात्वीक मिमांसा सर्वसमान्य समाजापासून दूर होती. या आचार विचारांचे पालन करणे सर्व सामान्य समाजाला अशक्य होते. ही गरज जाणूनच वर्धमान महाविरांनी जैन धर्माच्या आचार विचार विषयक तत्वात काही भर घालून या धर्माच्या प्रचारास चालना दिली. जैन धर्माच्या परंपरेनुसार जैन धर्म हा प्राचीन असून तो वेगवेगळया कालखंडामध्ये तिर्थंकरांच्या मार्फत तो पुन्हा पुन्हा सांगीतला गेला आहे. जैनमतानुसार कालचक्र सतत फिरत असून कालाचा प्रवाह अनादी व अंनत आहे.

जैन धर्म हा वैदिक कालाहूनही प्राचीन आहे. कारण अनेक तिर्थकारांची नावे वैदिक वाड.मयात आढळतात असा जैनांचा दावा आहे. वैदिक वाड.मयात जे स्वयंमभू काश्यपाचे वर्णन केले आहे. ते म्हणजे जैनांचे प्रथम तिर्थंकर भगवान ऋषभनाथ होय. असा जैन धर्माचा दावा आहे. युगायुगामध्ये जैन परंपरेचे प्रणेते होऊन गेले. त्यांना तिर्थंकर म्हणतात. जैनांचे २४ वे तिर्थंकर भगवान महावीरांनी वेदप्रामाण्य झुगारून यज्ञयाग, संस्कार, विधी यांचा निषेध केला सृष्टीकर्त्या ईश्वाराचे अस्तीत्व महावीरांनी अमान्य केले. विश्वचक्र हे अनादी अनंत आहे व ते व्यक्तीमात्राच्या कर्माप्रमाणे परावर्तीत होतात. जैनांची शिकवण त्रिरत्नामध्ये साठवली आहे.

१) सम्यक दर्शन २) सम्यक ज्ञान ३) सम्यक चारित्र्य

महावीरांनी पंचमहाव्रत्तेही सांगीतली:-

१) अहिंसा २) सत्य ३) अस्तेय ४) अपरिग्रह ५) ब्रम्हचर्य

महावीरांनी वैदिक कर्मकांडाचा निषेध केला. जातीभेदाला विरोध केला लोकभाषेत धर्माची शिकवण दिली . त्यागाची शिकवण दिली. महावीरांचे तात्कालीन राजघराण्यांशी आप्तसंबंध होते. त्यामुळे त्यास उदार राजाश्रय मिळाला. नंदराजांनीही जैन धर्मास आश्रय दिला. चंद्रगुप्त मौर्य राजत्याग करून जैन साधू झाले कलिंग सम्राट खारवेल यांनी जैन धर्माचा पुरस्कार करून प्रचार व प्रसार केला. सम्राट अशोकाचा नातू संप्रतीने जैन धर्म प्रसारासाठी माळवा, आंध्र, तमीळ देशात जैन धर्म प्रसारक पाठवले. दक्षिणेत सातवाहन राजांनी जैन धर्माला राज्याश्रय दिला. महाक्षत्रप रूद्रसिंह यांने ही गिरनार शिलालेखात जैन केवलींचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे. दक्षिणेत राष्ट्रकुट , चालुक्य, कदंब, गंग, या राजांनी जैन धर्माला राज्याश्रय दिला व जैन धर्म दक्षिणेत टिकवून ठेवला. कालकाचार्य कथानकानुसार शकराज्यांनी जैन धर्माचा स्विकार केल्याचे समजते. गुजरातच्या चालुक्य, गुर्जर यांनी पश्चिम भारतात जैन धर्म स्विकारला. जैनांनी धर्मांतर घडवून आणण्याचा उत्साह फारसा दाखवला नाही. गुप्तोत्तर काळात जैन आचार्य तर्कशास्त्र व वादविवाद यांच्या भरीस पडले. सहाजिकच त्यामुळे प्रचारकार्य मंदावले

व उत्तोरोत्तर जैन धर्मास ओहोटी लागली. जैन धर्म शांततेचा पुरस्कर्ता असून हिरिरीने परमतखंडन करून स्वधर्माचा प्रसार करणे जैन साधूंना कधीच मान्य नव्हते. वाद करून धर्म वाढवणे हे त्यांच्या विचार प्रणालीला धरून नव्हते. जैनांची व्यापक अहिंसा व कडक आचारधर्म यामुळे त्यांना कधीच मोठ्या प्रमाणात अनुयायी मिळाले नाहीत. विरोधकांशीही जुळवून घेऊन आपली परंपरा ठिकवीण्याचा यशस्वी प्रयत्न जैनांनी केला भारतातील प्रमुख हिंदु धर्माशी जैनांनी कधीच वैरभाव दाखवला नाही. जैनांनी अहिंसा तत्वज्ञान बनवून भारतात अहिंसा वृत्तीत वाढ केले.

जैन हा जीन या संस्कृत शब्दापासून बनलेला शब्द आहे. जीन म्हणजे ज्याने वासना, आकांक्षा, इच्छा, तृष्णा जिंकली ज्याने सर्व इंद्रिये जिंकली असा व्यक्ती होय. जैन धर्माचे संस्थापक ऋषभनाथ होय. असे जैन धर्मात २४ तिर्थंकर झाले. जैन धर्माने जगाला शांततेचा संदेश दिला.

२४ तिर्थंकर पुढीलप्रमाणे:

१) ऋषभनाथ २) अजितनाथ ३) संभवनाथ ४) अभिनंदन ५) सुमतीनाथ

६) पद्मप्रभू ७) सुपार्श्वनाथ ८) चंद्रप्रभू ९) पुष्पदंत

१०) शीतलनाथ ११) श्रेयांसनाथ १२) वासुपुज्य १३) विमलनाथ

१४) अनंतनाथ १५) धर्मनाथ १६) शांतीनाथ १७) कुंथूनाथ १८) अरहनाथ
१९) मल्लीनाथ २०) मुनीसुव्रत २१) नमीनाथ २२) नेमीनाथ
२३) पार्श्वनाथ २४) महावीर

संशोधन विषयाचे गरज : -

भारतात निर्माण झालेल्या काही मोजक्या धर्मापैकी एक धर्म म्हणजे जैन धर्म होय. राजाश्रयामुळे हा धर्म भारतात वाढला. या धर्माची वाढ भगवान महावीरानंतर त्यांच्या शिष्यांनी केली. त्यातील एक शिष्य आचार्य भद्रबाहू व स्थूलभद्राचार्य होय. मगधात दुष्काळ पडल्यामुळे आचार्य भद्रबाहू आपल्या शिष्यांसह दक्षिण भारतात श्रवणबेळगोळा येथे आले व स्थूलभद्राचार्य व त्यांचे शिष्य उत्तर भारतात थांबले. त्यांनी आपल्या शिष्यांना पांढरे वस्त्र उत्तर भारतात असणाऱ्या थंडीमुळे वापरण्यास परवानगी दिली . भद्रबाहू दुष्काळानंतर उत्तर भारतात परतले. त्यांनी पांढरे वस्त्र घालण्यावर बंधने घालण्याचा प्रयत्न केला. यातूनच जैन धर्मात दोन पंथ निर्माण झाले. १. दिगंबर २. श्वेतांबर हे होय. दिगंबर पथ हा कर्मठ जैनांचा आहे. या धर्माची राजाश्रया नंतर जी घसरण झाली त्यात या धर्मातील मुनी परंपरातही खंड पडला त्यांची सुरवात पुन्हा विसाव्या शतकात प्रथम आचार्य शांतीसागर महाराज यांनी दिगंबर जैन धर्मातील दिगंबर मुनीच्या जैन परंपराची पुर्नस्थापना केली. त्यानंतर अनेक आचार्यांनी जैन धर्म वृध्दी करण्यास सुरवात केले. त्यातील एका जैन आचार्य पुष्पदंतसागर जी महाराज यांचे प्रवचन ऐकून एक तेरा वर्षाचा बालक प्रभावीत झाला व त्यांने जैन साधू होण्याचे ठरवले. त्या बालकाचे नाव होते पवनकुमार जैन होय. ज्यांना सर्व भारतात पुढे त्यांच्या कडवे प्रवचनासाठी पाहीले ते क्रांतीकारी राष्ट्रसंत मुनीश्री तरूणसागरजी महाराज होय.

क्रांतीकारी राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज व त्यांचे कडवे प्रवचन :-

राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज हे नव्यायुगातील दिगंबर जैन मुनी होते. त्यांच्यापासुन जैन धर्मात नविन चैतन्य, उत्साह व क्रांती होण्यास सुरूवात झाली. महाराष्ट्र व संपूर्ण भारतभर फिरून त्यांनी कडवे प्रवचन देण्यास सुरूवात केले. त्यांनी संपत्ती साठवण्याऱ्यावरीती एक चांगले उदाहरण दिले आहे. ते म्हणतात की, लक्ष्मी पुजेच्या योग्य आहे. पण ती विश्वास ठेवणे योग्य नाही. लक्ष्मीची पुजा करा पण तिच्यावर विश्वास ठेवू नका. मात्र भगवंताची पुजा भलेही करू नका पण भगवंतावरील श्रध्दा ढळू देऊ

नका. जगात विश्वास फक्त भगवंतावरच ठेवा लक्ष्मीचा काय भरवसा ती तर चंचल आहे. आज याच्या जवळ तर उदया त्याच्या जवळ ज्यानी ज्यानी तीच्यावर भरवसा केला अखेरीस तीने त्यांना रडवलेच आहे.

खूप वर्षापासून भारत भूमीला एका कबीराची प्रतीक्षा होती. कबीरानंतर अनेक संत या राष्ट्रात झाले परंतु कबीर कोणीही होऊ शकले नाही. कबीर होण्यासाठी जरूरी आहे. त्या संताच्या शब्दातील अंगार जी समाजातील विषमता आणि विसंगती यांना जाळून टाकेल आणि खूप वर्षानंतर ते शब्दातील अंगार राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या माध्यमातून समाजातील विषमता आणि विसंगती यांना जाळून टाकण्याचा प्रयत्न करत आहे. तेराव्या वर्षा संन्यास घेतल्यानंतर कोणाला वाटले होते. हा बालक पुढे जाऊन आपल्या क्रांतीकारी विचारांनी संपूर्ण भारत भूमीत एक विषमता आणि विसंगती विरोधात वादळ निर्माण करेल. जैन संत पासून जन-संत बनण्यासाठी या क्रांतीकारी अग्नी- पुरूषाने एक खूप लांबचा पल्ला गाटला आहे. १ जानेवारी १९९५ रोजी या क्रांतीकारी संताने राजवाडा (इंदुर मध्यप्रदेश) आपल्या एका प्रवचनात त्यांनी सांगीतले की मी महावीर भगवानांना जैनांपासून व मंदिरातून मुक्त करू इच्छितो कारणकी महावीर भगवानांनचा संदेश व त्यांचे जिवन चरित्र संपूर्ण जगा समोर यावे तेव्हा संपूर्ण जैन समाज त्यांच्या या वत्कव्याच्या विरोधात गेला होता. त्यावेळी प्राचीन जैन समाजाच्या प्रथा व परंपरा यावरती पहिल्यांदा त्यांच्या समाजातील मुनींनी घातलेला हा पहिला हातोडा होता. आज पण जैन धर्मीयांना हे शब्द खटकतात. पहिल्यांदाच फक्त जैन धर्मीय लोक त्यांच्या शब्दानी व विचारांनी घायाळ होत होते. आता तर त्यांचे विचार ऐकून इतर धर्मीय लोक ही आवाक व स्तब्द्ध होतात.

धर्माबद्दल तर तरूणसागरजी महाराज म्हणतात ५० वर्षानंतर भोजन बदलले पाहीजे, १०० वर्षानंतर राहते घर पाडले पाहिजे, ५०० वर्षानंतर मंदीर व मज्जीद मोडल्या पाहिजे, १००० वर्षानंतर धर्माला बदलले पाहिजे कारण १०० वर्षानंतर घराची डिजाईन जुनी झालेली असते ५०० वर्षानंतर मंदीर व मज्जीद आपल्यामुळ हेतू पासून भरकटलेले असतात, १००० वर्षानंतर धर्मात अनेक चुकीच्या गोष्टी घुसलेल्या असतात. प्रत्यक धर्माच्यासोबत आज हे घडत आहे आणि हेच कारण आहे की, आज कोणताही धर्म त्यातील आसणाऱ्या किंवा येणाऱ्या समस्याचे निराकरण करू शकला नाही. अशा या क्रांतीकारी संताचा जन्म दमोह जिल्हा मध्यप्रदेशातील गुहंची या गावी २६ जून १९६७ रोजी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव पवनकुमार जैन होते. वडील प्रतापचंद्रजी जैन एक जैन श्रावक होते. पवनकुमारचे शिक्षण माध्यमीक शाळेपर्यतचे झाले होते. त्यांना संस्कृत, हिंदी व इंग्रजी या भाषांचे ज्ञान अवगत होते. तेराव्या वर्षी संन्यास

घेणारा आचार्य कुन्दकुंद यांच्या पश्यात २००० वर्षातील प्रथम जैन साधू आहेत. २६ जानेवारी २००३ ला मध्यप्रदेश सरकारव्दारे इंदोर मधील दशहरा मैदानावर त्यांना राष्ट्रसंत ही उपाधी देण्यात आली. चार राज्यात त्यांना मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या कडून राजकीय अतिथी हा सन्मान त्यांना प्राप्त होता. जवळ- जवळ चार डझण पुस्ताकांची निर्मीती राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराजांनी केली आहे. झी-टीव्हीच्या माध्यमातून १२२ देशात महावीर वाणीस सुरूवात केली. १ जानेवारी २००० रोजी नविन शतकाच्या पहिल्या सकाळी त्यांनी मांस निर्यात व पशुहत्ये विरोधात राष्ट्रीय अहिंसात्मक आंदोलानाचे नेतृत्व करताना. लाल किल्यावरून ऐतिहासीक "अंहिसा महाकुंभ" या अभियानांची सुरूवात राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आली व त्यानंतर राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांनी अहिंसा, शांती, देशप्रेम, आध्यात्म सामाजीक सदभावना यासाठी भारतभ्रमण करण्यास सुरूवात केली. यासाठी जनतेने त्यांचे "क्रांतीकारी संत" म्हणून कौतुक केले.

विषय निवडीचा हेतू :-

१. जैन धर्मातील प्रथा व परंपराचा अभ्यास करणे.

२. २००० वर्षानंतर आचार्य कुंन्दकुंद यांच्या नंतर तेराव्या वर्षी सन्यांस राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराजानी घेणे.

३. राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराजांचे धार्मीक व समाजीक कार्याचे अवलोकन करणे.

४. राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराजांच्या क्रांतीकारी विचारांची चिकीत्सा करणे.

वाड.मयीन संशोधन, सामाजकी व धार्मीक संशोधन व जैन धर्म या तीन गटात संशोधनाची वर्गवारी करता येते.

१. तरूणसागरजी महाराजांच्या "कडवे प्रवचन " या पुस्तकाचे सहा भाषामध्ये अनुवाद करण्यात आला आहे. यातून सामाजीक व धार्मीक गोष्टीवर त्यांनी भाष्य केले आहे.
२. "आई" या पुस्तकात तरूणसागरजी महाराजानी आईचे जीवनातील महत्व स्पष्ट केले आहे.
३. "दु:ख से मुक्ती कैसे मिले ?" या पुस्तकात जीवनात येणाऱ्या दु:खा पासून माणसाला मुक्ती मिळून जिवन सुखी करण्याचा मंत्र दिला आहे.

४. "मै सिंखाने नही , जगाने आया हू " या पुस्तकात तरूणसागरजी महाराजांच्या भोपाळ येथील ३३ अमृत प्रवचनाचे संकलन आहे.

याशिवाय "कडवे प्रवचनाच्या" सातव्या व आठव्या भागचे पुस्तक जगात सर्वात उंच ५१ फुट आहे. या पुस्तकाचे ग्रीनीच बुक ऑफ रेकॉर्डमध्ये सर्वात उंच पुस्तक म्हणून नोंद करण्यात आली आहे. मुनी श्री तरूणसागरजी यांच्या कडवे प्रवचनमध्ये म्हणतात की माझी प्रवचने त्यांच्यासाठी आहेत. ज्यांना काही करून दाखवायचे आहे. अडचणी व सिध्दांताना सामोरी जाऊन सिध्दांतावर दृढ राहीच आहे. माझे प्रवचन वेळ वाया घालवण्याचे (टाईमपास) साधन नाही. तर वेळ काळाला सोबत घेऊन विचार करायची साधना आहे. कुरूक्षेत्रावर श्रीकृष्णाने जेव्हा गीता सांगीतली तेव्हा तेथे एकमात्र श्रोता होता. अर्जुन ------- ती गीता लोखो-करोडो श्रोते श्रवण करीत आहेत. ... माझ्या क्रांतीकारी विचारासांठी एक श्रोता मिळाला तरी पुरेसा आहे.

त्याचप्रमाणे "क्रोध को कैसे जितें" या पुस्तकात मुनी श्री तरूणसागरजी यांनी प्रत्येक मनुष्याची समस्या राग (क्रोध) आहे. प्रत्येक मनुष्य रागाने परेशान आहे. या पुस्तकात यांनी रागावर नियंत्रण करण्याची कला मानव जातीला सांगीतली आहे. "चपल-मन " हा मुनी श्री तरूणसागरजी महाराजांचे कवितावरील पुस्तक आहे. " मृत्यू-बोध " या पुस्तकात मुनी श्री सागरजी महाराज म्हणतात की, जिवनाचे शाश्वत सत्य मृत्यू हे आहे तरी ही मनुष्य मृत्यूला भयभीत होतो. यातील एक-एक वाक्य ऐवढे गोड , पवित्र, जिवंत आणि तजेलदार आहेत. की मन प्रत्येक वाक्य विचार करायला लावण्यास भाग पाडणारे आहे.

तात्पर्य :-

जैन धर्माचा इतिहास, वाड.मय ,त्यांच्या परंपरा, चालीरीती यावर क्रांतीकारी संत तरूणसागरजी महाराजांनी अचूक बोट ठेवले. जैन धर्माची भरभराट होणे यातून आवश्यक आहे. क्रांतीकारी राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांनी केलेल्या सामाजिक व धार्मिक योगदानाचा चिकीत्सक अभ्यास आजवर झालेला नाही. म्हणून प्रस्तुत संशोधकांने हा विषय प्रबंधासाठी निवडला आहे.

संशोधानाचे उद्दीष्टे :-

प्रस्तुत संशोधनाची उद्दीष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराजांचे चरित्र अभ्यासणे.
२. राष्ट्रसंत तरूणसागरजी महराजांच्या समाज व धर्मावरील प्रवचनांचा चिकित्सक अभ्यास करणे.

३. राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराजांच्या पुस्तकांची वर्गवारी करून त्यांचे सामाजिक व धार्मिक योगदान स्पष्ट करणे .
४. राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराजांच्या महाराष्ट्र तसेच भारतातील जैन धर्माला दिलेल्या योगदानाचे मुल्यांकन करणे.
५. निष्कर्षांची मांडणी करणे.

संशोधनाच्या मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन हे राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या जैन धर्म व समाजातील योग्यदानापुरते मर्यादीत आहे. तसेच हे संशोधन त्यांची पुस्तके व त्यांच्या प्रवचनांच्या वरती आधारीत आहे.

संशोधनाचे गृहीतके :-

प्रस्तुत संशोधनाचे गृहीतके खालीलप्रमाणे आहेत.

१. राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या अभ्यासातून महाराष्ट्र व भारतातील जैन धर्मावर प्रकाश पडतो.
२. राष्ट्रसंत तरूणसागरजी महारांजाच्या पुस्ताकातून जैन धर्माच्या सामाजीक व धार्मिक प्रश्नावर प्रकाश पडतो.
३. राष्ट्रसंत तरूणसागरजी महारांजाच्या प्रवचनांचे संपादन व प्रकाशन होणे आवश्यक आहे.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधन हे जैन धर्माच्या विश्लेशणात्मक स्वरूपाचे चिकित्सक संशोधन आहे. हे संशोधन राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या प्रवचानांवर तसेच राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या प्रसीध्द साहीत्यावर आधारीत आहे. यासाठी प्रस्तुत विषयाची निगडीत विश्लेशणात्मक अभ्यासाची पध्दती स्वीकारण्यात आली आहे.

प्रकरण योजना :-

प्रस्तुत संशोधनाची प्रकरण योजना खालील प्रमाणे राहील.

१) प्रास्तवीक

या प्रकारणात संशोधन विषयाचे महत्व, उद्देष्टे, गृहतके, मर्यादा आणि संशोधन पध्दतीची मांडणी करण्यात येईल. तसेच विषयाच्या अनुषंगाने पूर्व संशोधनाचा मागोवा प्रस्तुत करण्यात येईल.

२) **प्रकरण पहिले :-** राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांचे जीवनचरित्र अभ्यासणे.

प्रस्तुत प्रकारणात राष्ट्रसंत तरूण सागरजी महाराज यांच्या जीवन चरित्रा विषयी सविस्तर चर्चा करून त्याचा समग्र आढावा प्रस्तूत करण्यात येईल.

३) **प्रकरण दुसरे** :- राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या साहित्याचा चिकित्सक आभ्यास करणे.

प्रस्तुत प्रकरणात राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या प्रकाशीत साहीत्याचा चिकित्सक अभ्यास करूणे.

४) **प्रकरण तिसरे** :- राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या धार्मिक कार्याचे मुल्यमापन करणे.

प्रस्तुत प्रकरणात राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या धार्मिक कार्याचे महत्व स्पष्ट करून याचा चिकित्सक अभ्यास करण्यात येईल.

५) **प्रकरण चौथे** :- राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या सामाजिक कार्याचे मुल्यमापन करणे.

प्रस्तुत प्रकरणात राष्ट्रसंत तरूणसागरजी महाराज यांच्या सामाजिक कार्याचे महत्व स्पष्ट करून याचा चिकित्सक अभ्यास करण्यात येईल.

६) **प्रकरण पाचवे** :- निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाच्या निष्कर्षाची मांडणी करण्यात येईल.

प्रबंधाच्या शेवटी संदर्भ ग्रंथाची सुची व परिशिष्टे देण्यात येतील .

*** संदर्भ सुची ***

१. कडवे प्रवचन भाग १ ते १०
२. खट्टे मिठ्ठे तिखे बोल
३. मॉ
४. दु:ख से मुक्ती कैसे मिले.
५. मै सिखाने नही जगाने आया हूँ.
६. चपल - मन
७. मृत्यू- बोध
८. क्रोध को कैसे जिते.
९. क्रांतीकारी प्रवचन.
१०. जिने की कला.
११. गुस्सा और जिद.
१२. अहिंसा- महाकुंभ (मासिक)
१३. क्रांती - पथ
१४. लोकसंत लोकोत्तर की और
१५. प्रबुध्दों की बीच बुध्द के इशारे
१६. अर्थी सजा के रखना
१७. महाविरोदय
१८. २१ वी सदी और अहिंसा महाकुंभ
१९. प्राचीन भारताचा इतिहास - प्रा. र. ना. गायधनी
२०. प्राचीन भारताचा इतिहास - प्रा. डॉ. कदम, प्रा. डॉ. वाघमारे, प्रा. डॉ. लोंखडे, प्रा. डॉ. वाघमोडे.